# राजर्षी शाहू महाराज – एक आदर्श व्यक्तीमहत्त्व

– प्रा. विशाल तुकाराम निकम

**राजर्षी शाहू महाराज यांचे शैक्षणिक कार्य –**

राजर्षी शाहू महाराजांच्या काळात बहुजन समाज शिक्षणापासून वंचित राहिला होता, शिक्षण ही फक्त वरिष्ठ वर्गाचीच मक्तेदारी बनली होती. येथील बहुजन समाजाच्या मागासलेपणाचे एक महत्त्वाचे कारण त्याच्यातील शिक्षणाचा अभाव होय, ही गोष्ट शाहू महाराजांनी ओळखली. म्हणून बहुजन समाजात शिक्षणाचा प्रसार घडवून आणण्याच्या कार्याला त्यांनी अग्रक्रम दिला.

**वसतिगृहांची स्थापना –**

महाराजांनी त्या दिशेने उचललेले एक महत्त्वाचे पाऊल म्हणजे कोल्हापुरात निरनिराळ्या जातिधमांच्या विद्यार्थ्यांसाठी केलेली वसतिगृहांची स्थापना होय. वसतिगृहे ही त्या काळातील एक महत्त्वाची गरज होती; कारण त्या काळी शिक्षणाच्या सोयी फक्त शहरातच उपलब्ध होत्या. ग्रामीण भागातील सर्वसामान्य लोक अतिशय हलाखीच्या परिस्थितीत जीवन जगत होते. साहजिकच, आपल्या मुलांना शिक्षणासाठी शहराच्या ठिकाणी पाठविण्याची कुवत त्यांच्याकडे नव्हती.

तेव्हा ग्रामीण भागातील गोरगरीब मुलांचे शिक्षण मार्गी लावायचे असेल, तर शहरात त्यांच्या वास्तव्याची अल्पखर्चात व्यवस्था करणे गरजेचे आहे, ही गोष्ट शाहू महाराजांच्या लक्षात आली. म्हणून त्यांनी कोल्हापुरात वसतिगृहे सुरू करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार १८ एप्रिल, १९०१ रोजी मराठा विद्यार्थ्यांसाठी 'व्हिक्टोरिया मराठा बोर्डिंग हाऊस'ची स्थापना करण्यात आली.

त्यानंतर लवकरच लिंगायत, सारस्वत, पांचाल, जैन, मुसलमान, नामदेव शिंपी, देवज्ञ, वैश्य, ढोर द्ब चांभार, नाभिक इत्यादी जातींच्या विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र वसतिगृहे सुरू करण्यात आली. या सर्व वसतिगृहांना महाराजांनी सढळ हाताने आर्थिक साहाय्य केले . याशिवाय कोल्हापूरबाहेरील पुणे, नागपूर, नाशिक, नगर इत्यादी शहरांतील शैक्षणिक संस्थांनादेखील त्यांनी आर्थिक मदत केली होती.

**विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती –**

बहुजन समाजातील गरजू व होतकरू विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्त्या देऊन त्यांना

शिक्षण घेण्यास प्रोत्साहन देण्याचे धोरण राजर्षी शाहूंनी ठेवले होते. २० मे, १९११ रोजी त्यांनी एक जाहीरनामा काढून १५ टक्के विद्यार्थ्यांना नादारी आदेशही त्यांनी काढला. देण्याची घोषणा केली. ही सवलत प्रथम गरीब विद्यार्थ्यांना देऊन नंतर राहिल्यास इतर विद्यार्थ्यांना द्यावी, असा आदेश त्यांनी काढला.

**सक्तीचे व मोफत प्राथमिक शिक्षण –**

राजर्षी शाहू महाराजांनी शिक्षणक्षेत्रात उचललेले आणखी एक क्रांतिकारक पाऊल म्हणजे त्यांनी आपल्या राज्यात राबविलेली सवतीच्या व मोफत प्राथमिक शिक्षणाची योजना होय. ८ सप्टेंबर , १९१७ रोजी त्यांनी कोल्हापूर संस्थानात प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत करण्यासंबंधीचा आदेश जारी केला. त्या संदर्भात आपले विचार व्यक्त करताना महाराजांनी म्हटले होते– शिक्षणाशिवाय कोणत्याही देशाची उन्नती झाली नाही, असे इतिहास मोफत शिक्षणाची हिंदुस्थानला अत्यंत आवश्यकता आहे.

अज्ञानात बुडून गेलेल्या देशात उत्तम मुत्सद्दी व लढवय्ये वीर कधीही निपजणार नाहीत, म्हणून सक्तीच्या व ३० सप्टेंबर, १९१७ पासून ही सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची योजना करवीर संस्थानात लागू झाली. करवीर तालुक्यातील ' चिखली ' या गावी सक्तीचे पण मोफत प्राथमिक शिक्षण देणारी पहिली शाळा ४ मार्च, १९१८ रोजी सुरू झाली.

**राजर्षी शाहू महाराज यांचे अस्पृश्योद्धाराचे कार्य –**

पददलित व मागासलेल्या वर्गाची उन्नती हे शाहू महाराजांनी आपले जीवितकार्य मानले होते. साहजिकच, अस्पृश्यांवरील अन्यायाचे निवारण करण्यासाठीही ते सतत प्रयत्नशील राहिले. अस्पृश्य विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सोय व्हावी म्हणून १९०७ मध्ये राजर्षींनी त्यांच्यासाठी कोल्हापुरात ' मिस क्लार्क बोर्डिंग ' या नावाचे एक वसतिगृह उभारले. १४ एप्रिल, १९०८ पासून या वसतिगृहाचे कामकाज प्रत्यक्षात सुरू झाले.

अर्थात, अस्पृश्यतेच्या प्रश्नाची सोडवणूक करण्यासाठी अस्पृश्यांना प्रथम आर्थिकदृष्ट्या स्वत:च्या पायावर उभे राहता येईल, अशी परिस्थिती निर्माण केली पाहिजे, याची महाराजांना जाणीव होती. म्हणून त्यांनी अस्पृश्यांना स्वतंत्र व्यवसाय सुरू करण्यास प्रोत्साहन दिले. त्यासाठी अस्पृश्य जातीच्या लोकांना उपाहारगृहे, दुकाने चालविण्याकरिता त्यांना आर्थिक साहाय्य केले. अस्पृश्यांना मानाने जगता यावे म्हणून शाहू महाराजांनी त्यांना सरकारी नोकऱ्या मिळवून दिल्या.

महार, मांग, चांभार इत्यादी जातींतील सुशिक्षित लोकांना त्यांनी वकिलीच्या सनदा दिल्या. थोडक्यात, येथील जातिव्यवस् अस्पृश्यांवर व्यवसायासंबंधी जे

निर्बंध घातले होते ते निर्बंध दूर करून अस्पृश्यांना सर्व प्रकारचे व्यवसाय करण्याचे स्वातंत्र्य राजर्षींनी दिले. आपल्या राज्यात अस्पृश्यता पाळली जाऊ नये याकडेही शाहू महाराजांनी लक्ष दिले. अस्पृश्यांना शाळा, दवाखाने, पाणवठे, सार्वजनिक विहिरी, सार्वजनिक इमारती इत्यादी ठिकाणी समानतेने वागवावे, असे आदेश त्यांनी काढले होते.

MAHATMA PHULE MAHAVIDYALAYA

जे सरकारी अधिकारी किंवा नोकर या आदेशांचे पालन करणार नाहीत, त्यांच्याविरुद्ध कडक कारवाई करण्याचा इशाराही त्यांनी दिला होता. राजर्षी शाहूंनी अस्पृश्यांची गुलामगिरी नष्ट करण्याच्या उद्देशाने १८ सप्टेंबर, १९१८ रोजी आपल्या राज्यातील महार वतने रद्द केली आणि त्या जमिनी अस्पृश्यांच्या नावावर रयतवारीने करून दिल्या. अस्पृश्यांकडून वेठबिगारी पद्धतीने कामे करून घेण्याच्या प्रथेवरही त्यांनी कायद्याने बंदी घातली होती. याखेरीज राजर्षींनी अस्पृश्यांसमवेत सहभोजने आयोजित केली; तसेच अस्पृश्य परिषदा भरवून त्यांमध्ये सक्रिय सहभाग घेतला.

**समाजसुधारणेच्या क्षेत्रातील कार्य –**

अस्पृश्यता निवारणाच्या कार्याबरोबरच अन्य प्रकारच्या सामाजिक सुधारणांना चालना देण्याचे कार्यही शाहू महाराजांनी केले होते. समाजसुधारणेच्या बाबतीत त्यांचा दृष्टिकोन अत्यंत पुरोगामी होता . जातिभेदाला त्यांचा विरोध होता. जातिभेद नष्ट झाल्याखेरीज आपल्या समाजाची उन्नती होणार नाही, असे त्यांचे ठाम मत होते. म्हणून जातिभेद दूर करण्यासाठी त्यांनी प्रयत्न चालविले होते.

या प्रयत्नांचाच एक भाग म्हणून २३ फेब्रुवारी, १९१८ रोजी महाराजांनी आपल्या राज्यात आंतरजातीय विवाहाला मान्यता देणारा कायदा केला; तसेच त्यांनी स्वतः असे काही विवाह घडवून आणले. स्त्रियांच्या प्रश्नाविषयीही त्यांना जिव्हाळा वाटत होता. जुलै, १९१७ मध्ये त्यांनी पुनर्विवाहाचा कायदा करून विधवाविवाहाला कायदेशीर मान्यता मिळवून दिली. १९१९ मध्ये स्त्रियांना क्रूरपणे वागविण्यास प्रतिबंध करणारा कायदा केला. १९२० मध्ये घटस्फोटाचा कायदा केला. याशिवाय देवदासींची प्रथा बंद करण्यासाठीही त्यांनी कायद्याच्या मार्गाचा अवलंब केला.

**मागासवर्गीयांसाठी राखीव जागा–**

२६ जुलै, १९०२ रोजी ' करवीर गॅझेट ' मध्ये एक जाहीरनामा प्रसिद्ध करून छत्रपती शाहूंनी एक क्रांतिकारक आणि भारताच्या इतिहासातील अभूतपूर्व निर्णय घेऊन आपल्या द्रष्ट्या पुरोगामित्वाचे दर्शन घडविले. या जाहीरनाम्याच्या तारखेपासून सरकारी खात्यात रिक्त होणाऱ्या जागांपैकी ५० टक्के जागांवर मागासवर्गीय सुशिक्षित तरुणांची भरती करण्यात येईल, असे त्यांनी जाहीर केले.

ज्या सरकारी कार्यालयात मागासवर्गीयांची संख्या ५० टक्क्यांपेक्षा कमी आहे तेथे या पुढे मागासवर्गीयांची भरती करावी, असा आदेश त्यांनी दिला.

ब्राह्मण, शेणवी, श्रभू व पारशी या पुढारलेल्या जातिव्यतिरिक्त इतर सर्व जातींचा समावेश या आदेशान्वये मागासवर्गीयांमध्ये केला गेला होता. या निर्णयाविरुद्ध समाजातील वरिष्ठ वर्गाने फार मोठे काहूर माजविले. त्यावर महाराजांनी असे स्पष्टपणे बजाविले की, मला राज्य सोडावे लागले तरी बेहत्तर; पण मागासलेल्या व अविकसित समाजाच्या सेवेचे व्रत मी सोडणार नाही.

**सत्यशोधक चळवळीचे नेतृत्व –**

राजर्षी शाहू महाराज यांची सर्वांत महत्त्वाची कामगिरी अशी की , महात्मा फुले यांच्यानंतर निष्प्राण होत चाललेल्या सत्यशोधक चळवळीला त्यांनी संजीवनी देऊन तिच्यात नवचैतन्य निर्माण केले; त्यामुळे येथील बहुजन समाजाची अस्मिता जागृत झाली. त्यातूनच पुढे ब्राह्मणेतर चळवळीचा उगम झाला. या चळवळीला शाहू महाराजांच्या रूपाने खंबीर व प्रभावशाली नेतृत्व लाभले.

**महात्मा फुले यांचे खरेखुरे वारसदार –**

सामाजिक चळवळीच्या क्षेत्रातील महात्मा फुले यांचे खरेखुरे वारसदार राजर्षी शाहू हेच होत. त्यांच्याच प्रेरणेने ११ जानेवारी, १९११ रोजी कोल्हापुरात सत्यशोधक समाजाची शाखा स्थापन केली गेली; किंबहुना, अस्तंगत होऊ लागलेल्या या समाजाची एक प्रकारे पुनःस्थापनाच केली गेली . या कार्यात पुढाकार घेतलेल्या कार्यकर्त्यांना शाहू महाराजांनी पाठिंबा दिला आणि वेळोवेळी मार्गदर्शन केले. नवगठित सत्यशोधक समाजाला महाराजांनी आर्थिक तसेच अन्य प्रकारची मदत मिळवून दिली. त्यांच्याच पाठबळामुळे यापुढील काळात सत्यशोधक चळवळीचा महाराष्ट्राच्या विविध भागांत वेगाने प्रसार झाला.